पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक


# सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ ● वर्ष १ ● अंक ७३ ● गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAMAR/ 26 /A4531 | Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

मन शांत असेल तर
निर्णय चुकत नाहीत, आणि
भाषा गोड असेल तर आपले
दूर होत नाहीत!




## »थोडक्यात

### शिंदेंनी डबल गेम केला; मनोज जरांगे संतापले!

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पहिल्यांदाच एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. एकनाथ शिंदे डबल गेम करत असल्याचा गंभीर आरोप जरांगेंनी केला. भुमरेंसाठी मराठा समाजाच्या पोरांनी जीवाचे रान केले. आमच्या उपकारांची परतफेड करता का? भुमरे मामा तुम्ही सहा नंबरला होते, तुम्ही इतक्या लवकर विसरलात का? सध्या तात्पुरते घ्या आणि नंतर रद्द करा, असं बावनकुळे यांनी सांगितलं होतंय. देवेंद्र फडणवीस बोलत नाहीत, याचा अर्थ मुकसमंती आहे. संजय सिरसाठ यांनी का केलं असावं, हा कट एकनाथ शिंदे यांनीच केला, असाही गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला.

### प्रशांत किशोर थेट सुनेत्रा पवारांच्या भेटीला!

**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या विविध नेत्यांच्या भेटीगाठींना वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातच राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे. प्रशांत किशोर हे निवडणूक रणनीती आणि राजकीय नियोजनासाठी ओळखले जातात. अलीकडेच त्यांनी बिहारच्या पोटनिवडणुकीत मिळवलेल्या घवघवीत विजयाची चर्चा होती. त्यांनंतर आता अचानक त्यांची सुनेत्रा पवार यांच्यासोबत झालेली भेट नेमकी कोणत्या कारणासाठी होती, याबाबत आता वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. ही भेट देवगिरीवर झाल्याचे वृत्त समोर येत आहे.

### निविष्ठा घोटाळ्यात 15 कृषी अधिकारी निलंबित

धाराशिव : मागील वर्षीच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना मोफत वाटप करावयाच्या कृषी निविष्ठामध्ये अधिकाऱ्यांनी संगनमत करून तब्बल २१ कोटी ३३ लाखांचा घोटाळा केला.

या प्रकरणाची चौकशी होऊन बुधवारी रात्री कृषिमंत्र्यांनी घोटाळ्यात सहभागी १५ अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. २०२५-२६ च्या खरीप हंगामात राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण योजनेअंतर्गत २१ कोटी ३३ लाख रुपये कृषी निविष्ठा वाटपासाठी मंजूर होते. दरम्यान, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांसह उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकाऱ्यांनी संगनमत करून निविष्ठा वाटप न करताच कोट्यावधी रुपये हडपल्याचे समोर आले. आमदार कैलास पाटील यांनी याविषयाची पुराव्यासह तक्रार केली होती.

# दिंगबर लोखंडे, रतनसिंग पवार यांच्या निलंबनाचे काय ?

## शिक्षकांवर कारवाईचा बडगा, पण मुख्य सूत्रधार मोकाट ?

## 33 शिक्षकांचे निलंबित तर 65 जणांची वेतनवाढ रोखली

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

**अकोला :** जिल्हा परिषद शिक्षण विभागातील दिव्यांग व विशेष संवर्गाच्या नावाने बनावट कागदपत्रे सादर करून बदल्या लाटल्याचा मोठा घोटाळा नुकताच उघडकीस आला आहे. या प्रकरणात १३६ शिक्षकांवर दोषारोप ठेवत ३३ शिक्षकांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले, तर ६५ जणांची वेतनवाढ रोखण्यात आली. मात्र, या संपूर्ण कारवाईमुळे प्रशासनाच्या प्रामाणिकतेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

'कागदपत्रे सादर करणारे शिक्षक दोषी, मग त्यांची पडताळणी न करता डोळे मिटून बदल्यांना मंजुरी देणारी तालुकास्तरीय बदली समिती मधील बीडीओ, टीएचओ आणि गटशिक्षणाधिकारी ( सात तालुक्यांचे २१ अधिकारी) आणि जीएडी चे प्रमुख डेप्युटी सीईओ दिगंबर लोखंडे, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार निर्दोष कसे ?' असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.




जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा व जिल्हांतर्गत बदल्यांची प्रक्रिया ऑनलाईन व पारदर्शक पद्धतीने राबवली जाते. यासाठी शासन निर्णयानुसार स्पष्ट निकष ठरवून देण्यात आले आहेत. विशेष संवर्ग भाग-१ व २ अंतर्गत दिव्यांग, गंभीर आजार, घटस्फोटीत किंवा परितत्तåया महिला शिक्षकांना बदल्यांमध्ये प्राधान्य दिले जाते. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी सक्षम वैद्यकीय अधिकारी किंवा शासकीय प्राधिकरणाचे अधिकृत प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करणे बंधनकारक असते. शासनाने हे निकष गरजू शिक्षकांना दिलासा देण्यासाठी बनवले होते. मात्र, अकोला जिल्हा परिषदेत या नियमांचा उघडपणे चोरावर मोर होऊन दुरुपयोग करण्यात आला.

काही शिक्षकांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे, खोटे घटस्फोटाचे दाखले व चुकीची माहिती सादर करून विशेष संवर्गातून बदल्या लाटल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाला जाग आली. त्रिस्तरीय चौकशी समितीच्या अहवालानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी शिक्षकांवर निलंबनाची कारवाई केली. परंतु, प्रश्न असा उपस्थित होतो की, ज्या वेळी शिक्षकांनी हे ऑनलाईन अर्ज व बनावट प्रमाणपत्रे सादर केली, त्या वेळी बदली समितीने त्यांची प्राथमिक छाननी का केली नाही? प्रमाणपत्रांची सत्यता न तपासताच त्यांना विशेष संवर्गाचा लाभ कसा मंजूर करण्यात आला ?

### रतनसिंग पवार यांच्या मेहरबान कोण ?

» पंधरा वर्षापासून रतनसिंग पवार अकोल्यात आहे. विस्तार अधिकारी,गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि शिक्षणाधिकारी असा पंधरा वर्षाचा काळ पवार यांचा अकोल्यात आहे. मुळचे अकोल्यातील असलेले रतनसिंग पवार यांच्यावर राज्य सरकार शिक्षण विभाग मेहरबान का असा प्रश्न उपस्थित होतो. बोगस शिक्षकांना मान्यता देणे, डुप्लिकेट शालार्थ आय डी तयार करण्यात कोणाचा हात आहे याचा ही शोध राज्य सरकारने घेण्याची गरज आहे. शालार्थ आय डी बोगस घोटाळ्यात अकोल्यात तपास का नाही याची चौकशी झाल्यास मोठा खुलासा होऊ शकतो असे सूत्रांचे म्हणणे आहे.

### गटशिक्षणाधिकारी,शिक्षणाधिकारी यांचे निलंबन केव्हा

» शिक्षकांवर विभागीय कारवाई आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तयारी सुरू असताना, या घोटाळ्यास अप्रत्यक्षपणे खतपाणी घालणारे अधिकारी मात्र सहीसलामत सुटताना दिसत आहेत. शिक्षकांनी सादर केलेली कागदपत्रे शासकीय नियमानुसार आहेत की नाही, ती अधिकृत आहेत की बनावट, याची पडताळणी करण्याची अंतिम जबाबदारी कोणाची होती. त्याच बरोबर ज्या शासकीय यंत्रणांनी शिक्षकांना बनावट, खोटे प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले त्यांच्यावर कारवाई होणार आहे की नाही. असा प्रश्न उपस्थित होत आहे. या विषयावर रतनसिंग पवार यांनी कुठली ही प्रतिक्रिया दिली नाही.

### एस आय आर आणि जनगणनेचे काय

» निवडणूक आयोगाचे विशेष सखोल फेरतपासणी चे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यात जिल्हा परिषदेच्या ३३ शिक्षकांचे निलंबन समोर आल्याने या शिक्षकांकडे असलेले हे काम प्रभावित होणार आहे. इतकेच नाही तर निलंबित ३३ शिक्षकांच्या जागेवर कोणाची नियुक्ती करणार आणि शैक्षणिक सत्र सुरु झाल्याने विद्यार्थ्यांचे काय, जनगणनेच्या कामाचे काय असा प्रश्न अनुत्तरीत आहे. या सर्व प्रक्रियेत शिक्षक संघटनांची चुप्पी अधोरेखित होत असून बदल्यांसाठी पैसे घेणारे मोकाट फिरत असल्याची ओरड आहे.

### जिल्हा परिषदेच्या या ३३ शिक्षकांचे केले निलंबन

१ चंद्रशेखर द्वारकाप्रसाद दिक्षीत
२ कु. श्वेता हेमंतराव खुमकर
३ संतोष महादेव पाचपोर
४ वंदना रंगलाल राठोड
५ रविंद्र महादेव ढोकणे
६ कु. वैशाली रामराव लोणकर
७ स्वप्राली पोतदार
८ सिमा नजम मोहम्मद इब्राहिम
९ मोहम्मद फैसल शेख भोलु अन्सारी
१० आशा उत्तमराव मालधुरे
११ संदिप सहदेव महल्ले
१२ विजय दामोदर भांडे
१३ प्रेमा मोहनप्रसाद दुबे
१४ सोनल चंद्रकांत पाऊलझागडे
१५ प्रतिभा विजय भांडे
१६ महेंद्र सुधाकर धनोकार
१७ विद्या सुनिल आखरे
१८ नरेंद्र किसनराव इंगळे
१९ शितल नागोराव टापरे
२० देवानंद आनंदराव मोरे
२१ उज्वला नरेंद्र इंगळे
२२ मनिषा रामेश्वर सूर्यवंशी
२३ रेणूका साहेबराव बाबर
२४ कृपाली शेंडोकार
२५ वर्षा नागसेन गोपनारायण
२६ इमरान हुसेन इरफान हुसेन
२७ भारती अविनाश वासनिक
२८ रुपाली नितिन माळोदे
२९ वैदेहि विनोद वैद्य
३० वैशाली लक्ष्मणराव देशमुख
३१ मनिषा काकडे
३२ दिपाली जाधव
३३ मिनाक्षी आपोतीकर

### केवळ शिक्षकांनाच बळीचा बकरा का

» शिक्षणाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आणि मान्यतेशिवाय बदलीची प्रक्रिया पूर्ण होऊच शकत नाही. मग आपली प्रशासकीय जबाबदारी पूर्णपणे टाळणाऱ्या आणि संशयास्पद कागदपत्रांवर डोळे झाकून सह्या करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अजूनपर्यंत निलंबनाची कारवाई का नाही. या प्रकरणात केवळ शिक्षकच नव्हे, तर बनावट प्रमाणपत्रे देणारे आरोग्य विभागाचे अधिकारी/कर्मचारी आणि ती डोळे मिटून स्वीकारणारे शिक्षण विभागाचे अधिकारी यांचाही मोठा आर्थिक व्यवहार व संगनमत असल्याचा दाट संशय व्यक्त केला जात आहे. त्याच बरोबर पती पत्नी शिक्षकांचे अंतर ठरविणाऱ्या बांधकाम विभागाच्या बनावट बोगस प्रमाणपत्रांचे काय त्यांच्यावर कोण कारवाई करणार असा प्रश्न विचारला जात आहे.

# संविधानाशी द्रोह करणाऱ्यांचा शेवट कायद्यानेच होईल!

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय देशाच्या लोकशाहीवर दूरगामी परिणाम करणारा ठरेल. आम्ही पूर्णपणे निश्चिंत आहोत. कायदा आपले काम करेल. ज्यांनी बेईमानी केली, ज्यांनी संविधानाशी द्रोह केला, त्यांच्यावर कायद्याच्या चौकटीत कारवाई होईल आणि न्याय मिळेल, यावर आमचा पूर्ण विश्वास आहे, असे खा. संजय राऊत म्हणाले. शिवसेना पक्षाचे



नाव आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाच्या मालकी हक्कासंदर्भातील वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. काल न्यायालयात ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी जोरदार युक्तिवाद मांडल्यानंतर राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, हा केवळ शिवसेना पक्षाचा खटला नाही, तर देशातील लोकशाही आणि संविधानाच्या भवितव्याशी संबंधित ऐतिहासिक खटला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य सर्वोच्च न्यायालयालाही पूर्णपणे माहीत आहे. काल न्यायालयीन कामकाजादरम्यान न्यायमूर्तींचे निरीक्षण करताना मला ही जाणीव प्रकर्षाने झाली. दरम्यान, शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्हाच्या मालकी हक्काच्या या बहुचर्चित प्रकरणाची सुनावणी आजही सर्वोच्च न्यायालयात सुरू राहणार आहे. आजच्या सुनावणीत न्यायालय कोणती भूमिका घेते आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया कशी पुढे सरकते, या महत्वपूर्ण सुनावणाकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# नियमानुसार काम जमत नसेल तर राजीनामे देऊन घरी जा!

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

### तुकाराम मुंढे एफडीएच्या 29 कर्मचाऱ्यांना इशारा

**छत्रपती संभाजीनगर :** अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तथा आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्या २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. 'ज्यांना शासनाच्या नियमांनुसार काम करायचे नसेल त्यांनी राजीनामा देऊन निघून जावे,' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सुनावले. त्यामुळे एफडीएमधील कामकाजाच्या पद्धतीवरून सुरू झालेला वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील राज्य अन्न आणि औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळेतील २९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या कार्यपद्धतीबाबत खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ यांच्याकडे तक्रार केली आहे. १५ जुलै रोजी सादर करण्यात आलेल्या निवेदनात दोन शिफ्टमध्ये काम करण्याचा निर्णय, शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी काम करण्याचे आदेश, रिक्त पदांमुळे वाढलेला कामाचा ताण तसेच त्यामुळे नमुन्यांच्या तपासणीच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सह्याही आहेत.

या तक्रारीनंतर तुकाराम मुंढे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत कर्मचाऱ्यांच्या आक्षेपांना उत्तर दिले. तुकाराम मुंढे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरमधील कर्मचाऱ्यांनी माझ्या विरोधात मंत्री महोदयांकडे तक्रार केली की सुट्टी दिली जात नाही, अनेक तास काम करावं लागतं. त्यांची पहिली मागणी आहे की, त्यांना इतर कार्यालयांप्रमाणे १०-६ ट्रिटमेंट द्यावी. मुळात लॅब हे कार्यालय नाही. लॅबची सेवा ही २४ तास चालणारी संस्था असते. इतर शासकीय कार्यालयात वेळ फिक्स असते पण लॅबमध्ये तसं नसते.

### केजरीवालांचे इस्टाग्राम अकाउंट केले बंद!

**दिल्ली :** आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला. थेट त्यांचे इंस्टाग्राम अकाऊंट बंद करण्यात आले. त्यांनी मेटावर गंभीर आरोप करत पीएम मोदी यांच्यापुढे झुकल्याचे म्हटले. अरविंद केजरीवाल यांनी ई- २० इंधनाच्या मुद्द्यात सरकारवर हल्लाबोल केला. हेच नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घरावर मोर्चा काढला. अरविंद केजरीवाल यांनी एक्सवर सोशल मिडिया पोस्ट शेअर केली. यादरम्यान त्यांनी इंस्टा अकाऊंट बंद झाल्याचा फोटोही शेअर केला.

# जात पडताळणी विभाग स्वतंत्र- महसूलमंत्री बावनकुळे

प्रतिनिधी | ६ ऑगस्ट

**मुंबई :** माझी नार्को टेस्ट करण्यास कोणतीही अडचण नाही. मी त्याला परवानगी देईल. जात पडताळणी करणारा विभाग हा अर्ध न्यायिक विभाग आहे. त्यात शासनाला हस्तक्षेप करता येत नाही. जात पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयात माझा किंवा सरकारमधील मंत्र्यांचा हस्तक्षेप आहे, असे म्हणणे अयोग्य ठरेल. पडताळणीचा विभाग स्वतंत्र असून ते त्यांच्या अधिकारात काम करतात, असे उत्तर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मनोज जरांगे यांनी केलेल्या आरोपांना दिले आहे.

जात पडताळणी समितीने कोणताही निर्णय दिला असला तरी त्याविरोधात उच्च न्यायालयात अपील करता येते. आमच्यावर अन्याय झालेला आहे, असे कुणाला वाटत असेल तर त्यांनी उच्च न्यायालयात जाऊन त्या निर्णयावर स्थगिती आणता येते, असेही बावनकुळे म्हणाले.

### मनोज जरांगे यांचे आरोप काय?

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठ्यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. 'राजकीय द्वेषातून प्रमाणपत्र रद्द केले. देवेंद्र फडणवीस तुम्ही विनाकारण मराठ्यांना अंगावर घेत आहात, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे रद्द करायला सांगत आहेत. बावनकुळे हे काय फडणवीसांचे मालक झाले का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

# मला ८ सेकंदात झोप लागते अन् मी ३ तास झोपतो!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : नवीन खासदार मित्रांना दिला कानमंत्र



वृत्तसंस्था | ६ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** मी वर्तमानात जगतो. मी आता तुमच्यासोबत असतो तेव्हा मी दुसऱ्या कशाचाही विचार करत नाही. दिवसभराच्या कामानंतर झोपायला गेल्यावर मला आठ सेकंदांतच झोप लागते. मी फक्त तीन तास झोप घेतो. त्यानंतर मी अंथरुणावर पडून राहूच शकत नाही. माझा वर्षानुवर्षांचा हाच दिनक्रम आहे, असे गुपीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

पंतप्रधानांनी आम आदमी पक्ष, बिजू जनता दल व तृणमूल काँग्रेसमधून अलीकडेच भाजपमध्ये आलेल्या ३५ ते ३६ खासदारांबरोबर चहापान आणि चर्चा केली. यावेळी तुम्ही इतक्या लोकांना भेटत असताना वेळेचे नियोजन कसे करता, असे खासदार अशोक मित्तल यांनी विचारल्याचे समजते. त्यावर पंतप्रधानांनी आपले गुपीत उघड केले. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीनही उपस्थित होते.

पंतप्रधानांना भेटलेल्या खासदारांमध्ये सुश्मिता देव, राजेंद्र गुप्ता, राहुल सिंह, स्वाती मालीवाल, राघव चड्ढा, अशोक मित्तल, संदीप पाठक, विक्रमजितसिंह साहनी आदींचा समावेश होता. यावेळी पंतप्रधानांनी त्यांना अनेक कानमंत्र दिले. पंतप्रधान मोदींनी 'एनडीए'तील या नवीन मित्रांना सभागृहात अधिक वेळ घालवण्याचे आणि प्रत्येक ज्येष्ठ सदस्यांकडून काही तरी शिकण्याचे आवाहन केले. तसेच दिल्ली हे धोकादायक ठिकाण असून, खासदारांनी ल्युटेन्स झोनमध्ये सावधगिरी बाळगावी, असे सांगताना तुमच्याभोवतीच्या सापळ्यांपासून सांभाळून राहा, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'एनडीए'तील नव्या मित्रांना दिला. विशेषतः मोबाइलवर बोलताना भाषा संयत ठेवावी आणि दुसऱ्यांवर आपली मते लादू नयेत, असा इशाराही मोदींनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

### 'आधी त्यांचे ऐका, ते तुमचे ऐकतील'

जंतरमंतरवर अलीकडेच झालेल्या विद्यार्थी आंदोलनाचे सावट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या रालोआ खासदारांच्या बैठकीवरही राहिले. निवडक राज्यसभा खासदारांशी झालेल्या भेटीत आणि अलीकडेच इतर पक्षांमधून रालोआमध्ये आलेल्या खासदारांशी संवाद साधताना पंतप्रधानांनी 'जेन झी'बद्दल बोलताना, 'आधी त्यांचे ऐका, मग ते तुमचे ऐकतील,' असा सल्ला उपस्थितांना दिला.

### ज्येष्ठ पत्रकार तरुण तेजपाल बलात्कार प्रकरणात दोषी!

**मुंबई:** बहुचर्चित तहलका लैंगिक अत्याचार प्रकरणात माजी संपादक तरुण तेजपाल यांना मोठा धक्का बसला आहे. २०२१ मध्ये गोवा सत्र न्यायालयाने तरुण तेजपाल यांची केलेली निर्दोष मुक्तता मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केली आहे. या निर्णयामुळे या प्रकरणाला मोठे वळण मिळाले असून, आता त्यांच्यावर पुढील कायदेशीर आणि न्यायालयीन प्रक्रिया पार पडणार आहे. न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले आणि न्यायमूर्ती अमित जामदार यांच्या खंडपीठाने यावर सुनावणी घेतली. न्यायालयाच्या खंडपीठाने तेजपाल यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(एफ) आणि ३७६(२)(के) तसेच कलम ३५४-ए आणि ३५४-बी अंतर्गत बलात्कार आणि लैंगिक छळाच्या गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले आहे.



# अतिवृष्टीची जिल्ह्यातील 4 हजार 408 हेक्टरवरील पिकांना झळ

## सर्वाधिक नुकसान मूर्तिजापूर तालुक्यात

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोला** : जिल्ह्यात 30 आणि 31 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे जवळपास 4 हजार 408 हेक्टरवरील पिके बाधित झाले असून, अकोट तालुक्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तसेच 24 घरांची पडझड झाली आहे. जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान मूर्तिजापूर तालुक्यात झाले आहे. विशेष म्हणजे माना या एकाच मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. याविषयीचा प्राथमिक अहवाल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत विभागीय कृषी सहसंचालकांकडे सादर केला आहे. मात्र प्रत्यक्ष पंचनामे झाल्यानंतर प्रत्यक्ष नुकसानीचे वास्तव समोर येणार आहे.

या अहवालानुसार, नुसार जिल्ह्यातील अकोट, पातूर आणि मूर्तिजापूर या तीन तालुक्यांतील 32 गावांमधील 4 हजार 403 हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तसेच तेल्हारा तालुक्यात 5 हेक्टरवरील पीक बाधित झाले आहे. जिल्ह्यात 30 व 31 जुलै रोजी सतत दोन दिवस जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामध्ये जिल्ह्यातील अकोट, तेल्हारा, बाळापूर, पातूर, अकोला व बार्शिटाकळी या सहा तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील नदी व नाल्यांना पूर आला होता. त्यामुळे नदी व नाल्यांच्या काठासह जिल्ह्यातील विविध भागांत शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचल्याने पिके पाण्याखाली बुडाली.



### जिल्ह्यातील 39 गावे बाधित

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील 39 गावे बाधित झाली असून, त्यात अकोट 10, तेल्हारा 1, पातूर 9, अकोला 1 व मूर्तिजापूर तालुक्यात 18 घरांचे नुकसान झाले. ते अकोट तालुक्यात एक व्यक्ती मृत्युमुखी पडला तर जिल्ह्यात 24 घरांची पडझड झाली आहे. तसेच शेती पिकांचे सर्वाधिक नुकसान मूर्तिजापूर तालुक्यात 4 हजार 241 हेक्टर, अकोट 95 हेक्टर तर पातूर तालुक्यात 67 हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत.

### पंचनामे झाल्यानंतरच नुकसानीचे वास्तव स्पष्ट

कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालात केवळ तीन तालुक्यांत पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला असला तरी, सहा तालुक्यांत अतिवृष्टी झाल्याच्या पृष्ठभूमीवर पीक नुकसानीचे पंचनामे झाल्यानंतरच वास्तव समोर येणार आहे. एकट्या मूर्तिजापूर तालुक्यात 4 हजार 241 हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. त्यामध्ये कापूस, सोयाबीन व तूर या पिकांचा समावेश आहे.

विविध भागांत सोयाबीन, कपाशी, तूर आदी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. त्यानुषंगाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे प्राप्त माहितीच्या आधारे जिल्ह्यातील पीक नुकसानीचा प्राथमिक अहवाल विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

# चाकूचा धाक दाखवून ३० बकऱ्यांची चोरी

प्रतिनिधी ६ ऑगस्ट





**पातूर** : पातूर-अकोला महामार्गावरील बस्टेशनजवळील शेतात राहणाऱ्या आदिवासी समाजातील शेळीपालक लोडू तुळशीराम डाखोरे यांच्या कोठ्यावर अज्ञात चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवत तब्बल ३० बकऱ्या चोरून नेल्याची धक्कादायक घटना ४ ऑगस्टच्या मध्यरात्री घडली. चोरीस गेलेल्या जनावरांमध्ये १० बोकड व २० बकऱ्यांचा समावेश असून त्यांची अंदाजे किंमत साडेतीन लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तिडके यांच्या शेतामध्ये आदिवासी समाजातील कामगार म्हणून वास्तव्यास असलेले लोडू तुळशीराम डाखोरे हे शेळीपालनाचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या शेतातील कोठ्यावर ३० ते ४० बकऱ्यांचे पालन-पोषण करण्यात येत होते.

मंगळवारी (४ ऑगस्ट) मध्यरात्रीच्या सुमारास चारचाकी वाहनातून आलेल्या ८ ते १० अज्ञात चोरट्यांनी शेतात प्रवेश केला. चोरट्यांनी धारदार चाकूचा धाक दाखवत कोठ्यातील ३० बकऱ्या जबरदस्तीने वाहनात भरून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेबाबत पातूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. मात्र, अद्यापपर्यंत केवळ चौकशी सुरू असून गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचा आरोप पीडितांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या मोठे नुकसान झालेल्या आदिवासी शेळीपालकाला तातडीने न्याय मिळावा, चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी आणि चोरीस गेलेल्या जनावरांचा शोध लावावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# भेसळयुक्त खाद्यतेलाबाबत तपासणीची मागणी

वि. प्रतिनिधी ६ ऑगस्ट



**अकोट** : शहरासह परिसरातील काही हॉटेल्स, ढाबे व खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये निकृष्ट दर्जाचे अथवा भेसळयुक्त खाद्यतेल वापरले जात असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. तसेच तेल वारंवार गरम करून वापरणे आणि चववर्धक पदार्थांचा अतिरेक होत असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) तसेच आरोग्य विभागाने अकोला-अकोट-परतवाडा महामार्गावरील हॉटेल्स, ढाबे तसेच शहरातील विविध खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची तपासणी करून खाद्यतेलाचे नमुने प्रयोगशाळेत तपासावेत, अशी मागणी केली आहे. नियमभंग अथवा भेसळ आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे.

## इयत्ता 1 ते 5 च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप; 13 ऑगस्ट रोजी कार्यक्रम

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**मूर्तिजापूर** : पीएम श्री स्व. रामदास भैय्या दुबे नगर परिषद प्राथमिक सेमी इंग्लिश शाळा, मूर्तिजापूर येथे शाळा सुधार मोहिमे अंतर्गत इयत्ता १ ते ५ मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच बूट व सॉक्सचे वाटप करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार हरीश पिंपळे राहणार असून, नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्यासह उपनगराध्यक्ष रोहित अवलवार प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. यावेळी शिक्षण सभापती सरिता राहुल पाटील,, बांधकाम सभापती संदीप सरताईक, महिला व बालकल्याण सभापती सोनल मुकेश काळपांडे, आरोग्य सभापती पूनम माडकर, मुख्याधिकारी निलेश जाधव, प्रशासन अधिकारी (शिक्षण) सुभाष म्हसने, शाळा सुधार समिती अध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे तसेच विभागीय कार्याध्यक्ष संजय गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमात मान्यवर देणगीदारांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार असून, हा उपक्रम स्व. भोलेशंकर हिरालाल गुप्ता (माजी उपनगराध्यक्ष) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मा. संजय गुप्ता यांच्या वतीने राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास पालक, नागरिक व शिक्षणप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बंजारा समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणार : सुनील पवार

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



**मुर्तीजापुर** : बंजारा समाजातील विविध प्रश्न, न्याय्य हक्क आणि मूलभूत समस्यांसाठी एकजुटीने संघर्ष करण्याची गरज असून, त्यासाठी 'ऑल इंडिया बंजारा सेवा संघ'च्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष सुनील महादेवराव पवार यांनी व्यक्त केली.

जिल्हाध्यक्ष नारायण चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आल्यानंतर सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी बोलताना सुनील पवार म्हणाले की, बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अकोला जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या विविध समस्या शासन आणि प्रशासनाच्या स्तरावर मांडून त्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणे, समाजातील युवकांना योग्य दिशा देणे, सामाजिक एकजूट अधिक बळकट करणे आणि समाजहिताच्या प्रश्नांवर एकत्रितपणे आवाज उठविणे, हा नूतन कार्यकारिणीचा प्रमुख उद्देश आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीत जिल्हाध्यक्ष : नारायण मा. चव्हाण, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष : प्रा. डी. एस. राठोड, जिल्हा उपाध्यक्ष : सुनील महादेवराव पवार, प्रा. बी. एस. पवार, जिल्हा सचिव : सतीश जाधव, जिल्हा सहसचिव : सतीश राठोड, धीरज आडे, जिल्हा कोषाध्यक्ष : प्रा. महेश राठोड, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख : कुंदन जाधव, जिल्हा संघटक : भीमराव राठोड, कुणाल जाधव, महादेव राठोड, नरेंद्र आडे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य : बंडू राठोड, पंडित राठोड, प्रवीण राठोड.

## शिक्षक भारतीच्या शहराध्यक्षपदी गौतम इंगळे



**हिवरखेड** : शिक्षक भारती संघटनेच्या हिवरखेड शहराध्यक्षपदी संत गजानन महाराज महाविद्यालय हिवरखेडचे प्राचार्य व द टारगेट अकॅडमीचे संचालक गौतम इंगळे यांची निवड करण्यात आली. शिक्षक भारती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कपिल पाटील यांच्या मार्गदर्शनात सुरेश देवकर आणि महेंद्र कराळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

## जाहीर नोटीस

### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

प्रोसेस क. २८०१/२०२६ — एम.जे.सी. क. २०३/२०२६

दिनांक ०४/०८/२०२६ — चौकशी तारीख - ०९/०९/२०२६

**अर्जदार** - १. श्रीमती ध्रुपदाबाई भाउराव विळपाते, वय ७७ वर्ष, धंदा घरकाम २. रवि भाउराव विळपाते, वय ४० वर्ष, धंदा मजुरी दोघे रा. मु. गाजीपुर, पोस्ट. पोपटखेड, ता. आकोट जि. अकोला ३. सौ सरला अशोक कोराम, वय ४५ वर्ष, धंदा घरकाम रा. कानशिवनी, ता. जि. अकोला

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे. अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क.१ चे पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील नामे भाउराव चिंधुजी विळपाते हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. गाजीपुरा, पोस्ट. पोपटखेड, ता. आकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. ०१/०१/२०१९ रोजी मयत झाले आहेत. तसेच भाउराव चिंधुजी विळपाते यांची आई नामे भुसाबाई चिंधुजी विळपाते हया बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत भाउराव चिंधुजी विळपाते यांना अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला

# मोठ्या राम मंदिरात महाआरती राम मंदिर भूमिपूजन आणि कलम 370 रद्द दिन साजरा

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



**अकोला** : 5 ऑगस्ट 2020 हा दिवस भारतीय इतिहासातील सुवर्ण दिवस आहे. याच दिवशी अयोध्येत प्रभू रामचंद्राच्या भव्य मंदिराचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते झाले. तसेच याच दिवशी जम्मू-काश्मीरमधील कलम 370 रद्द झाले आणि देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी सर्वात जास्त काळ गृहमंत्री राहण्याचा विक्रम केला.

या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ संत गजानन महाराज यांच्या पावन स्पर्शाने पावन झालेल्या मोठ्या राम मंदिरात महाआरती करण्यात आली.

कार्यक्रमापूर्वी प्रभू रामचंद्र राम दरबार, रामदेव बाबा, श्याम बाबा, गजानन महाराज, राणी सती दादी, हनुमंत राय, शिव दरबार यांची विशेष पूजा-अर्चना करण्यात आली. अकोल्यातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटून महान धरण भरावे, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक सुखी व्हावे यासाठी प्रार्थना करण्यात आली.

पंडित विवेक पाठी, पंडित ओमप्रकाश शर्मा, पंडित हेमंत शर्मा, घनश्याम शर्मा, राधेश्याम शर्मा, संतोष शुक्ला, चंद्रशेखर शर्मा, जनक जोशी यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात पूजा झाली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना दीर्घायुष्य लाभो, प्रभू रामचंद्राच्या विशाल मंदिराची ख्याती जागतिक स्तरावर व्हावी आणि सनातन धर्माचा सर्वत्र विजय व्हावा अशी प्रार्थना करण्यात आली.

महाआरतीनंतर सर्वांना प्रसाद वितरण करण्यात आले. 2020 पासून प्रभू रामचंद्राच्या भूमिपूजन दिन विविध स्वरूपात साजरा केला जात आहे. महाआरतीस गिरीश जोशी, गिरीराज तिवारी, कैलास मामा भारुका, प्रकाश राठी, प्रकाश भुसारी, अजय गुल्हाने, नितीन ढोले, राम ठाकूर, गोपाल शर्मा, विलास अनासने, योगेश शर्मा, राम रतन सारडा, सुदर्शन धोत्रे आशा जोशी, राधा जाधव, संगीता पाटील, सुरेखा चव्हाण, संजना गावंडे, मीरा अग्रवाल, सोनल अग्रवाल, अनिल जाधव, दीपक शर्मा, सुरेश ढोले, संजय जैन, रुपेश यादव, चंद्रशेखर खडसे, विजय अग्रवाल, सुरेश जयस्वाल, सुरेश गिरी, संजय पाटील, गजेंद्र मिश्रा, नितीन चितलांगे, सुरेश आहुजा, संगीता शाहू, सौरभ अंबरखाने, शंकर कुमार, शंकर खोवाल, सुरेश गुप्ता, सुनील अग्रवाल, विशाल लड्डा, संजय यादव, सुरेश पाशी, मनीष गावंडे, विवेक भरणे, संजना माळी आदी रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसस्थानक ते सोनू सेठ चौक रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरु



वि.प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोट** : शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांच्या समस्येची दखल घेत नगराध्यक्ष माया विवेक धुळे यांच्या पुढाकाराने बसस्थानक ते सोनू सेठ चौक या मार्गावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. पावसामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोकाही वाढला आहे. नगरपालिकेकडून शहरातील इतर प्रमुख रस्त्यांवरील खड्डेही टप्प्याटप्प्याने बुजविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. मात्र, दुरुस्तीची कामे दर्जेदार व टिकाऊ स्वरूपात करण्यात यावीत तसेच पावसाळ्यात रस्त्यांची नियमित पाहणी करून आवश्यक ठिकाणी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## जाहीर नोटीस

### विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात

प्रोसेस क. 2800/2026 — एम.जे.सी. क. २०१/२०२६

दिनांक 04/08/2026 — चौकशी तारीख - ०९/०९/२०२६

**अर्जदार** - १. श्रीमती लक्ष्मी वासुदेव मसराम, वय ७० वर्ष, धंदा घरकाम रा. मु. गाजीपुरा, पोस्ट. पोपटखेड, ता. आकोट जि. अकोला २. सौ गोदावरीबाई गोपाल उईके, वय ३० वर्ष, धंदा घरकाम रा.वार्ड क. २, ग्राम पलासुर, ता. नेपानगर, जि. बुऱ्हानपूर ३. सौ ज्योती ज्ञानेश्वर कुळमते, वय २७ वर्ष, धंदा घरकाम
रा. मु. शेलु खुर्द, पोस्ट. हातोला, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क.१ चे पती व अर्जदार क. २ व ३ ने वडील नामे वासुदेव गंगाराम मसराम हे आपले संपुर्ण जिवनकाळात मौजे. गाजीपुरा, पोस्ट. पोपटखेड, ता. आकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. १६/०९/२०१८ रोजी मयत झाले आहेत. तसेच वासुदेव गंगाराम मसराम यांचा मुलगा नामे पवन वासुदेवराव मसराम हा दि. २८/१०/२०२० रोजी मौजे. गाजीपुरा, पोस्ट पोपटखेड, ता. आकोट जि. अकोला येथे अविवाहीत मयम झाला आहे. तसेच मयत वासुदेव गंगाराम मसराम यांची आई नामे कलावंताबाई गंगाराम मसराम हया बरेच वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत वासुदेव गंगाराम मसराम यांना अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.


त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही - कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल.करीता आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला




शासकीय कामात अडथळा निर्माण होऊ नये याकरिता ठराविक शेतकऱ्यांची पोलिसांनी केली उचलबांगडी

# अकोटची खाई नदी प्रदूषणाच्या विळख्यात



प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोट** : शहरातून वाहणारी खाई नदी दिवसेंदिवस प्रदूषणाच्या विळख्यात सापडत असून नदीपात्रात सांडपाणी, प्लास्टिक व इतर घनकचरा साचल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पोपटखेड येथील धरणातून पाणी सोडल्यावरच नदीला प्रवाह मिळतो. उर्वरित काळात नदीत पाण्याचा प्रवाह अत्यल्प असल्याने सांडपाणी आणि कचरा नदीपात्रातच साचून राहतो.

### नदीकाठच्या हजारो नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न

खाई नदीलगत सोमवार वेस, राहुल नगर, अंजनगाव रोड आणि दर्यापूर रोड परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. नदीपात्रातील दूषित पाणी व दुर्गंधीमुळे या भागातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून डासांची संख्या वाढून साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि नदीकाठावरील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात गाळ, झुडपे आणि प्लास्टिक कचरा साचल्याने नदीचे नैसर्गिक स्वरूपही बदलत आहे. पावसाळ्यात धरणातून पाणी सोडल्यास हा कचरा पुढे वाहून जाऊन नदीच्या इतर भागातही प्रदूषण वाढण्याची शक्यता आहे. नदीपात्रातील गाळ, झुडपे आणि कचरा हटवून स्वच्छता मोहीम राबवावी खाई नदीचे वाढते प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा विषय नसून अकोट शहरातील हजारो नागरिकांच्या आरोग्याशी निगडित गंभीर प्रश्न बनला आहे.





# महापालिकेत नगरसेवक हेल्मेट विना
















# मनपा आमसभेत मदर डेअरीच्या जागेवरुन घमासान

## अर्वाच्च भाषेचा उपयोग भोवला

## सागर भारुकांचे पंधरा दिवसांसाठी निलंबन

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोला:** अपेक्षेप्रमाणे आज महापालिकेच्या सभागृहात जोरदार रणकंदन होणार याची अपेक्षा होती आणि झाले तसेच. मागील सभेचे इतिवृत्त कायम केल्यानंतर शहरात खासदार निधीतून काही प्रभागात ओपन जिम च्या निर्मिती बाबतच्या विषयांना मंजुरी देण्यात आली परंतु ज्या प्रभागात ओपन जिम मंजूर झाले नाही त्या प्रभागातील सदस्यांनी आपली नाराजी व्यक्त केली परंतु पुढच्या वेळेस या प्रभागात सुद्धा ओपन जिमची निर्मिती केली जाईल असे आश्वासन दिल्यानंतर या विषयाला मंजुरी देण्यात आली. नंतर विषय आला शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधील गीता नगर परिसरात मदर



डेअरी साठी पाच बाय पाच च्या जागेला मंजुरी देण्यासाठी. अभियंता संदीप गावंडे यांनी सभागृहात मदर डेअरी साठी पाच बाय पाच फूट ची जागा मंजुरीचा विषय मांडला. त्यावर बोलताना शिवसेनेचे सागर भारुका म्हणाले की ही जागा पाच बाय पाच फूट नसून पाच बाय पाच चौरस मीटर आहे तुम्ही सभागृहाची दिशाभूल करत आहात आम्ही काय--- आहोत काय ? असे म्हटल्यावर महापौरांनी शब्दाचा जपून वापर करा येथे महिला सुद्धा बसल्या आहेत. असे म्हटल्यावर मी काही चुकीचे बोललो नाही! असे सागर भारुका यांनी म्हटले त्यावर तुम्ही नेहमीच सभागृहात आवाज वाढवून बोलता, असे महापौरांनी म्हटल्यावर सागर भारुका म्हणाले, माझा आवाजात तसा आहे मी त्याला काय करणार! त्यानंतर शब्दाने शब्द वाढत गेल्यानंतर महापौरांनी सागर भारुका यांना पंधरा दिवसांसाठी निलंबित करण्याचे आदेश दिले. तसेच सुरक्षा रक्षकांना बोलावून सागर भारुका यांना सभागृहाबाहेर काढण्याचे निर्देश देत सभा दहा मिनिटांसाठी तहकूब केली.

### सामान्यांना हेल्मेट सक्ती नगरसेवकांचे काय ?

» शहरात सर्वसामान्य नागरिकांवर हेल्मेट सक्ती होत असताना महापालिकेचे नगरसेवक हेल्मेट न घातला महापालिकेत आले. जे नगरसेवक हेल्मेट न घातला महापालिकेत टु व्हिलरवर आले त्यांच्यावर अकोला पोलिस काय कारवाई करणार आहे. अशी विचारणा आता होत आहे. सर्व सामान्यांना एक हजार रुपयांचा मेमो देणारे अकोला पोलिस नगरसेवकांना मेमो देणार का अशी विचारणा आता सुरु झाली आहे.

# पातूरमध्ये माजी नगराध्यक्ष व नगरसेवकात हाणामारी; दोन्ही गटांकडून परस्पर तक्रारी

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**पातूर:** पातूर नगरपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही दिवसांतच शहरातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. बुधवारी सायंकाळी बाळापूर रोड परिसरात माजी नगराध्यक्ष हाजी सय्यद बुरान सय्यद नवी आणि नवनिर्वाचित नगरसेवक मोहम्मद शाकीर यांच्यात वाद होऊन त्याचे रूपांतर हाणामारीत झाल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, नगरसेवक मोहम्मद शाकीर यांच्या पत्नीने माजी नगराध्यक्ष हाजी सय्यद बुरान यांच्यावर विनयभंगाचा आरोप करत पातूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत, काही व्यक्ती आपल्या घरी येऊन तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकत होते तसेच जबरदस्तीने वाहनात बसविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दुसरीकडे, माजी नगराध्यक्ष हाजी सय्यद बुरान यांनीही नगरसेवक मोहम्मद शाकीर आणि त्यांच्या पत्नीविरुद्ध मारहाण, शिवीगाळ तसेच आरा मशीनमध्ये ढकलून जीवितास धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दिली आहे. घटनेनंतर दोन्ही गटांचे समर्थक पातूर पोलिस ठाण्यात मोठ्या संख्येने जमा झाल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात ठेवत दोन्ही पक्षांच्या तक्रारी स्वीकारून पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, नगरपरिषद निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या राजकीय वैमनस्यातून हा प्रकार घडल्याची चर्चा शहरात सुरू असून, नेमके काय घडले याबाबतचा खुलासा पोलिस तपासानंतरच होणार आहे.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा लाभ छोट्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे

## आमदार रणधीर सावरकर यांचे आवाहन

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोला:** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा 2.0 अंतर्गत आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पोकरा योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांच्या संदर्भात अकोला जिल्ह्यातील कृषी अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार झाली. योजनेचा लाभ छोट्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे असे आवाहन आमदार सावरकर यांनी केले. या बैठकीला किशोर काकडे, जयकुमार ठोकळ, महेंद्र काळे, प्रवीण हगवणे, संजय कोरडे, राजेश बेले, विवेक भरणे, वैभव माहोरे, नारायण बोर्डे, योगेश नागापुरे,



गणेश वानरे आदी अधिकारी उपस्थित होते. आमदार सावरकर म्हणाले,"राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योजना सुरू होताच माझी संचालक म्हणून निवड केली होती. आता माझ्याकडे सहअध्यक्ष म्हणून जबाबदारी दिली आहे. जागतिक बँकेच्या सहाय्याने राबवला जाणारा हा प्रकल्प महाराष्ट्रातील 19 जिल्हे आणि सुमारे 140 तालुक्यांतील शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणारा आहे. विशेषतः खारपाणपट्ट्यातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे." "ग्रामीण अर्थव्यवस्था मजबुत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार प्रयत्नशील आहेत. त्यांच्या प्रयत्नांना आपण सर्वांनी साथ द्यावी," असे आवाहनही त्यांनी केले.

# सूर्योदय आश्रमातील मुलांसोबत पंकज जायले व श्रीकृष्ण बाइसकरांचा वाढदिवस साजरा

## मुलांना शैक्षणिक साहित्याचे केले वितरण

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अकोला :** प्रत्येकाचा दरवर्षी वाढदिवस येतो परंतु वाढदिवस कसा साजरा करावा याचा सुंदर पायंडा मूकबधिर व दिव्यांगासाठी अविरतपणे कार्य करणारे समाजसेवक पंकज जायले व त्यांचे घनिष्ठ मित्र तथा बांधकाम व्यावसायिक श्रीकृष्ण बाईसकर यांनी पाडला. कारण वाढदिवस साजरा करण्याचे विविध फंडे आजकाल अवलंबले जातात मित्र व कुटुंबात जेवणावळी, केक कापण्याचा सार्वजनिक सोहळा, फ्लेक्स बाजी, पर्यटनाला जाणे, महागड्या वस्तूची खरेदी केली जाते. पण या सर्व प्रकाराला फाटा देत पंकज जायले व त्यांचे मित्र श्रीकृष्ण बाविस्कर यांनी आपला वाढदिवस शहरातील सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांसोबत साजरा करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे



वितरण करीत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले. आजच्या भरकटलेल्या तसेच सुसंस्कृतपणा विसरलेल्या युवा पिढीला या पंकज जायले व त्यांचे मित्र श्रीकृष्ण बाविस्कर या मित्रांनी नवीन आदर्श घालून दिला. या सुंदर कार्यक्रमाला माजी नगरसेवक पंकज साबळे मातोश्री श्रीमती सविताताई जायले किरण शिवराज पाटील कमलजीत कौर निशा मानकर कांचन साठले जया जायले निशा जायले सोनू गवई समाजसेवक केल्विन सुबी दीप जायले तसेच बालगृहाच्या काळजीवाहक रेखाताई बावने उपस्थित होत्या. सूर्योदय आश्रमातील मुलींनी स्वागत गीत गाऊन औक्षण करून या दोन्ही मित्रांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थित सर्वांनी या दोन्ही मित्रांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन केले. याप्रसंगी नगरसेवक पंकज साबळे कमलजीत कौर बालगृहाच्या काळजीवाहक रेखाताई बावणे यांनी आपले विचार व्यक्त करताना या दोन्ही मित्रांनी आपला वाढदिवस या अनाथ बालकांसोबत साजरा करीत त्यांचा उत्साह तर वाढविलाच परंतु समाजासमोर एक आदर्श निर्माण केल्याचे सांगत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या दोन्ही जिवलग मित्रांनी एकमेकांना मिठाई भरवीत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. नंतर उपस्थित सर्व अतिथींचे हस्ते सूर्योदय बालगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले याप्रसंगी मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्याजोगा होता. अत्यंत खेळीमेळीच्या आणि आनंदाच्या वातावरणात हा कौटुंबिक सोहळा पार पडला.

# 'तुझा मुलगा मरणार आहे का?' प्रकरणाची दखल; सीएमओची तात्काळ उचलबांगडी, चौकशी समिती गठित

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

अकोला : जिल्हा शासकीय सर्वोपचार रुग्णालयातील मुख्य वैद्यकीय अधिकारी (सीएमओ) यांनी एका आजारी चिमुकल्याच्या आईशी कथितपणे केलेल्या अवमानकारक वक्तव्यामुळे वातावरण तापले होते. "तुझा मुलगा मरणार आहे का? मला सलाईन लावता येणार नाही... तुला जेथे तक्रार करायची आहे तेथे कर," असे कथित वक्तव्य केल्याचा गंभीर आरोप असलेल्या डॉ. पुरुषोत्तम हंबर्डे यांना अपघात कक्षातून हटवून इतरत्र बदली करण्यात आली असून, संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समितीही गठित




करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात आमदार साजिद खान पठाण यांनीही कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध चौकशी करून कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर अवघ्या काही तासांत प्रशासनाने हालचाली सुरू केल्याने या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित झाली आहे. रुग्णालयात सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या आशा शेख बशीर यांनी आपल्या आजारी मुलाला उपचारासाठी नेल्यानंतर सीएमओंकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा गंभीर आरोप केला होता. उपचाराऐवजी उद्धट भाषा वापरल्याचे त्यांनी लेखी तक्रारीत नमूद केले असून, सात दिवसांत न्याय न मिळाल्यास आत्मदहनाचा इशाराही दिला होता. या धक्कादायक तक्रारीने जिल्हाभरात संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणाची दखल घेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने यांनी डॉ. पुरुषोत्तम हंबर्डे यांना अपघात कक्षातून तात्काळ हटवून इतरत्र बदली करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच तक्रारदार महिलेची सविस्तर बाजू ऐकून निष्पक्ष चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, सदस्य म्हणून डॉ. अभय बागुल (प्राध्यापक व विभागप्रमुख, बालरोगशास्त्र), डॉ. धोडीबा भिसे (प्राध्यापक व विभागप्रमुख, टीबी व चेस्टरोग विभाग), डॉ. रवी खंडारे (सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकित्सा विभाग) आणि श्रीमती ग्रेसी अगस्तीन (अधिसेविका) यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या घटनेनंतर डीन डॉ. संजय सोनुने यांनी जीएमसीमधील सर्व सीएमओ, डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी कोणत्याही परिस्थितीत गैरवर्तन, उद्धट वागणूक किंवा अवमानकारक भाषा वापरली जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# निवासी डॉक्टरांचा आजपासून अनिश्चितकालीन संप सुरु

## मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता कार्यालयासमोर धरणे आंदोलन

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

अकोला. इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये बीएचएमएस-सीसीएमपी धारकांच्या नोंदणीच्या विरोधात राज्यातील निवासी डॉक्टरांचे आजपासून अनिश्चितकालीन संप सुरू झाला आहे. यामुळे आज सकाळी निवासी डॉक्टरांनी सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. "होमिओपॅथी हटवा, रुग्णांचे प्राण वाचवा" अशा घोषणा देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी आज अधिष्ठाता कार्यालयासमोर धरणे आंदोलन




केले. विविध मागण्यांवर राज्य सरकारची संमती न झाल्याने असंतुष्ट 'महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स' म्हणजेच 'मार्ड'ने अनिश्चितकालीन संपाची घोषणा केली होती. या संपात अकोला शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह राज्यभरातील ३२ सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांचे निवासी डॉक्टर सहभागी झाले आहेत. यामुळे पहिल्या टप्प्यात ५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ६ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत केवळ आणीबाणी सेवा आणि कॅज्युअल्टी सुरू होती. ओपीडी, ऐच्छिक शस्त्रक्रिया, नियमित ड्युटी आणि शैक्षणिक उपक्रम पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. ६ ऑगस्टनंतर दुसऱ्या टप्प्यात आणीबाणीच्या सेवांसह सर्व सेवांवर बहिष्कार टाकला जाईल. आज बुधवारी सकाळी ९ वाजल्यापासून अधिष्ठाता

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## टाकळी शिवारात संततधार पावसात विहीर झाली जमीनदोस्त


प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**फुलसावंगी** : टाकळी (ई) परिसरात संततधार पावसामुळे अल्पभूधारक शेतकऱ्याच्या शेतातील विहीर पूर्णपणे खचून जमीनदोस्त झाली. शनिवारी मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान झाले आहे. महसूल प्रशासनाने पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. किशोर शिवाजी देशेवाड यांच्या शेतातील विहीर खचून नुकसान झाले. विहिरीसह पाणी उपसण्यासाठी बसविण्यात आलेली विद्युत मोटार, स्टार्टर व वीजखांबही मातीखाली गाडला गेला. विहीर जमीनदोस्त झाल्याने शेतीसाठीचा मुख्य पाण्याचा स्त्रोतच नष्ट झाला आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यावर नव्याने आर्थिक संकट कोसळले आहे. विहीर खोदकामासह अन्य बाबीसाठी शेतकऱ्याने मोठ्या प्रमाणात खर्च केला होता. या विहिरीच्या भरोशावर पिकांना सिंचन करण्याचे स्वप्न शेतकऱ्याने बघितले होते. मात्र टाकळी शिवारातील झालेल्या पावसाने शेतकऱ्याचे स्वप्न पुरते मातीत मिसळले.

# फिल्टर प्लांटमध्ये बिघाड; यवतमाळकरांना गढूळ पाणी पुरवठा

### दोन दिवस पुरवठा बंद राहणार, पाणी उकळून पिण्याचे आवाहन

प्रतिनिधी ६ ऑगस्ट







**यवतमाळ** : शहरातील नागरिकांवर पुन्हा एकदा पाणी समस्येचे संकट ओढवले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर प्लांटमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने शहरातील अनेक भागांत पिवळसर व गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पिवळसर, गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. प्रभाग क्रमांक १४ (ब) मधील पाटीपुरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, कळंब चौक, आंबेडकर नगर व दलित सोसायटी परिसरातील नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. नगरसेवक विपुल खोब्रागडे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे निवेदन देऊन तातडीने शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, विठ्ठलवाडी परिसरातील पाण्याच्या टाकीवरून मागील पाच महिन्यांपासून पिवळसर व गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विठ्ठलवाडी, वंजारी फैल, राजेंद्र नगर, गाडगे नगर, गिरी नगर, बांगर नगर तसेच लगतच्या परिसरातील नागरिकांना या समस्येचा सामना करावा लागत आहे. संबंधित पाणीपुरवठा यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी नगर परिषद उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नगरसेवक आनंद गायकवाड, पवन खडसे, धामणकर तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दरम्यान, जलशुद्धीकरण केंद्रातील तांत्रिक दुरुस्तीमुळे शहरातील विविध भागांतील पाणीपुरवठा दोन दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. ६ आणि ७ ऑगस्ट रोजी नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### दुरुस्तीला ४ दिवसांचा कालावधी

- जलशुद्धीकरण केंद्रातील तांत्रिक बिघाड दूर करण्याचे काम सुरू असून, पुढील २ ते ४ दिवसांत काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर शहरात नियमित शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिली आहे.

### शुद्ध पाणीपुरवठा करणार

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल-दुरुस्ती अंतर्गत फिल्टर प्लांटमध्ये तांत्रिक काम सुरू आहे. त्यामुळे सध्या येणारे पाणी वापरण्यास योग्य असले तरी नागरिकांनी पिण्यासाठी पाणी उकळून घ्यावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी संजय उमाळे यांनी केले आहे. तसेच दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर नियमित शुद्ध पाणीपुरवठा सुरू केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### या भागांना पाणी बंदचा फटका

- या पाणीबंदीचा फटका दर्डा मुख्य संतुलन टाकी, वाघापूर टेकडी मुख्य संतुलन टाकी, कार्यालयीन मुख्य संतुलन टाकीअंतर्गत येणाऱ्या भागांना बसणार आहे. दर्डा नगर, बेले लेआऊट, वनवासी मारोती, सुयोग नगर-२, शिवाजी नगर, ग्रामपंचायत लोहारा परिसर; तसेच वैभव नगर, वाघापूर टेकडी, प्रिया रेसिडेन्सी, मेडिकल टाकी, विठ्ठलवाडी, बालाजी टाकी, विसावा टाकी, पॉलिटेक्निक टाकी परिसरातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. याशिवाय निखील नगर, यूआयडीएसएसएमटी टाकी, राजाराम नगर टाकी, आरटीओ टाकी, जिंद्रान टाकी, रुख्मिणी टाकी आणि चापडोह पुनर्वसन टाकीअंतर्गत येणाऱ्या भागांतील पाणीपुरवठा ६ व ७ ऑगस्ट रोजी बंद राहणार आहे.

### आंदोलनाचा इशारा

- पाणीपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवली नाही तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर नागरिकांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेवकांसह नागरिकांनी दिला आहे.

## सराफा दुकान फोडणा-या टोळीचा पर्दाफाश; दरोड्यासह दोन गुन्ह्यांतील तिघे जेरबंद

### 60.10 लाखांचा मुद्देमाल हस्तगत; पुणे जिल्ह्यातून आरोपी अटकेत

प्रतिनिधी ६ ऑगस्ट




**यवतमाळ** : पांढरकवडा तालुक्यातील मोहदा येथील सराफा दुकानातील तब्बल 97.50 लाखांच्या चोरीसह दरोड्याच्या दोन गंभीर गुन्ह्यांचा यवतमाळ पोलिसांनी यशस्वी छडा लावला आहे.

या प्रकरणात पुणे जिल्ह्यातील तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून 60 लाख 10 हजार 802 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मोहदा येथील राजेंद्र श्रीमल वर्मा (वय 61) यांच्या 'राजेंद्र ज्वेलर्स' दुकानात 15 जुलैच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण 97 लाख 50 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. त्यापूर्वी 14 जुलै रोजी मोहदा-मेटीखेडा मार्गावर रविंद्र मंगल कांबळे यांना सात जणांनी अडवून मारहाण करत रोख रक्कम व सोन्याची अंगठी असा 44 हजार 300 रुपयांचा ऐवज लुटला होता. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास एकत्रितपणे करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन सात विशेष तपास पथके नियुक्त केली. तांत्रिक तपासादरम्यान गुन्ह्यात वापरलेले वाहन पुणे जिल्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर विशाल रघु कुंभार (रा. चाकण) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या चौकशीतून सौरुपशी उर्फ सौरसिंग राजकुमार राठोड (रा. शिक्रापूर) आणि अभिमन्यू अलसींग राठोड (रा. डाळींब) यांना अटक करण्यात आली. चौकशीत तिघांनी दोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली.

आरोपींकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेले चारचाकी वाहन असा 60.10 लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून तपास वेगाने सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार लहु तावरे, यशोधरा मुनेश्वर, संतोष मनवर, दत्ता पेंडकर, धीरज बांडे, धनराज हाके, सागर इंगळे, शिवशंकर कायंदे, अमोल राठोड, नितीन सुशीर, शरद लोहकरे तसेच स्थानिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस, पांढरकवडा, शिरपूर आणि उमरखेड येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## विहिरीत तरुणाचा मृतदेह आढळला

### मृत्यूचे गूढ उकलण्याचे पोलिसांसमोर आव्हान

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



**उमरखेड** : शहरातील महागाव रोडवरील पीडब्ल्यूडी क्वार्टर परिसरातील विहिरीत २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने बुधवारी संध्याकाळी परिसरात खळबळ उडाली. नितीन मच्छिंद्र कांबळे (रा. इंदिरानगर, उमरखेड) असे मृत तरुणाचे नाव असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद (मर्ग) करून तपास सुरू केला आहे.

महागाव रोडवरील पीडब्ल्यूडी क्वार्टर परिसरातील विहिरीत एका तरुणाचा मृतदेह तरंगताना असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आल्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच उमरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. स्थानिकांच्या मदतीने मृताची ओळख पटविण्यात आली.

दरम्यान, मृताचे वडील मच्छिंद्र कांबळे यांनी घटनास्थळी येऊन मृतदेहाची ओळख निश्चित केली. त्यांनी पोलिसांकडे कोणतीही तक्रार नसल्याचे जबाबात नमूद केल्याने पोलिसांनी सध्या मर्ग दाखल केला आहे. शवविच्छेदन अहवाल आणि अन्य पुराव्यांच्या आधारे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

विशेष म्हणजे, पीडब्ल्यूडी क्वार्टर परिसरातील याच विहिरीत मृतदेह आढळण्याची ही दुसरी घटना असल्याची चर्चा परिसरात सुरू असून, त्यामुळे नागरिकांमध्येही विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. मात्र, कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी तपास पूर्ण होणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## काँग्रेसची संघटनबांधणी मजबूत करण्यावर भर

### काँग्रेसची कार्यकारिणी व कार्यकर्ता आढावा बैठक



प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**झरी-जामणी** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, प्रत्येक बूथवर सक्रिय कार्यकर्त्यांची नियुक्ती करणे आणि जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यावर झरी तालुका काँग्रेसच्या कार्यकारिणी व कार्यकर्ता आढावा बैठकीत भर देण्यात आला.

खा. प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी आमदार वामनराव कासावार आणि सचिन नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. तालुक्यातील प्रत्येक गावात पक्षाची संघटना अधिक सक्षम करण्यासाठी बूथस्तरावर कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीत शेतकरी, शेतमजूर, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पक्षाचे कार्यक्रम आणि धोरणे जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, असे आवाहन करण्यात आले. आगामी निवडणुकांत पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळालेल्या उमेदवाराच्या विजयासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धारही बैठकीत व्यक्त करण्यात आला. संघटनात्मक बळकटी, जनसंपर्क वाढविणे आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देण्याचा संकल्प पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला.

## कोट्यवधींची इमारत धूळ खात; सात वर्षांपासून ट्रॉमा केअर सेंटर ठप्प

### 'वाढदिवस' साजरा करून प्रशासनाचे लक्ष वेधणार; बहुजन मुक्ती पार्टीची परवानगीसाठी धाव

प्रतिनिधी ६ ऑगस्ट




**दारव्हा** : उपजिल्हा रुग्णालय परिसरात कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेले ट्रॉमा केअर सेंटर उद्घाटनानंतरही सात वर्षांपासून कार्यान्वित झालेले नाही. परिणामी अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांना अपेक्षित आपत्कालीन आरोग्यसेवेपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप करत बहुजन मुक्ती पार्टीने या केंद्राचा 'सातवा वाढदिवस' साजरा करण्याची घोषणा केली आहे. या कार्यक्रमासाठी पक्षाने प्रशासनाकडे परवानगीची मागणी केली आहे.

यासंदर्भात बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांना निवेदन सादर केले. निवेदनानुसार, २८ ऑगस्ट २०१९ रोजी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ट्रॉमा केअर सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, सात वर्षे उलटूनही केंद्र सुरू न झाल्याने शासनाचा मोठा निधी निष्क्रिय अवस्थेत पडून असल्याचा दावा करण्यात आला आहे.

निवेदनात, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे अपघातग्रस्त आणि अतिगंभीर रुग्णांना तातडीची उपचार सुविधा मिळत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. ट्रॉमा केअर सेंटर तातडीने सुरू व्हावे, या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'वाढदिवस' हा प्रतीकात्मक निषेध आयोजित करण्यात येत असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.


या आंदोलनामागे कोणताही राजकीय हेतू नसून, नागरिकांना हक्काची आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हाच उद्देश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कार्यक्रम शांततापूर्ण आणि संविधानिक मार्गाने पार पडेल तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा येणार नाही, अशी ग्वाहीही पक्षाने दिली आहे.

दरम्यान, कोट्यवधी रुपयांची इमारत सात वर्षांपासून वापराविना पडून असल्याने नागरिकांमधूनही नाराजी व्यक्त होत आहे. आता तरी प्रशासन ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्याबाबत ठोस निर्णय घेणार का, याकडे दारव्हा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा काँग्रेसच्या सचिवपदी पूजा धुळे

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**उमरखेड** : यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नव्या कार्यकारिणीत उमरखेड येथील सामाजिक कार्यकर्त्या पूजा अंबादास धुळे यांची जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन



सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून 'अंबादास धुळे मित्र मंडळा'च्या माध्यमातून त्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत पक्षाने ही जबाबदारी दिली. पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवून संघटना अधिक बळकट करण्यासाठी काम करणार असल्याची प्रतिक्रिया पूजा धुळे यांनी व्यक्त केली.

## डायल ११२ : दारूच्या नशेत खोटी माहिती

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**महागाव** : डायल ११२ या आपत्कालीन सेवेवर उटी गावात जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर महागाव पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. मात्र, संपूर्ण गावाची तपासणी करूनही जुगाराचा कोणताही प्रकार आढळून आला नाही. चौकशीत संबंधित व्यक्तीने दारूच्या नशेत खोटी माहिती दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला.

महागाव तालुक्यातील उटी येथील अनिल साहेबराव वानखेडे (४०) यांनी मोबाईलवरून डायल ११२ वर जुगार सुरू असल्याची माहिती दिली होती. ड्युटीवरील पोलीस अंमलदार संदीप तळांडे यांनी ही माहिती महागाव पोलिसांना कळविल्यानंतर पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली पथक घटनास्थळी रवाना झाले.

उटी हे संवेदनशील आणि दुर्गम गाव असल्याने पोलिसांनी तक्रारीची गांभीर्याने दखल घेतली. कारवाईची गोपनीयता राखण्यासाठी अधिकारी साध्या वेशात खासगी वाहनाने गावात पोहोचले. माहिती देणाऱ्या व्यक्तीने दाखविलेल्या विविध ठिकाणांची तपासणी करण्यात आली; मात्र जुगार सुरू असल्याचा कोणताही पुरावा आढळला नाही.

यानंतर संबंधित व्यक्तीची चौकशी केली असता तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. स्थानिक नागरिकांकडूनही जुगार सुरू असल्याची पुष्टी झाली नाही. त्यामुळे डायल ११२ वर देण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी महागाव पोलिसांनी अनिल साहेबराव वानखेडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २९२ अंतर्गत अदखलपात्र गुन्हा क्रमांक ५७/२०२६ नोंदविला आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांनी दिली. पोलीस निरीक्षक वानखेडे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, डायल ११२ ही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरू करण्यात आलेली आपत्कालीन सेवा आहे. खोटी माहिती देऊन या सेवेचा गैरवापर केल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई केली जाईल. त्यामुळे नागरिकांनी केवळ खरी आणि तातडीची माहितीच या सेवेवर द्यावी.

## सुनेत्रा पवारांबाबतच्या वक्तव्याचा निषेध

प्रतिनिधी ६ ऑगस्ट




**उमरखेड** : महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्याचा आरोप असलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ उमरखेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बुधवारी संजय गांधी चौकात आंदोलन करण्यात आले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन सादर करून संबंधितांवर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकरराव तालंगकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त केला. निवेदनात सार्वजनिक जीवनातील व्यक्तींविषयी, विशेषतः महिला लोकप्रतिनिधींविषयी अवमानकारक भाषा वापरणे लोकशाही मूल्यांना आणि सुसंस्कृत राजकीय परंपरेला बाधा पोहोचवणारे असल्याचे नमूद करण्यात आले.

लोकशाहीत मतभेद व्यक्त करण्याचा अधिकार असला, तरी टीका करताना सभ्य व जबाबदार भाषेचा वापर अपेक्षित असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष दामोदर इंगोले, वनिता चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास खोकले, अविनाश पाटील, देविदास राठोड, अर्जुन चव्हाण, रेखा गायकवाड, श्रीकांत जाधव, शंकरराव बुरकुले, गजानन जाधव, प्रकाश राठोड, बबलू जाधव तसेच भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष अतुल खंदारे व पवन मेंढे उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक :** प्रदीप पुंडलिकराव देशमुख संपर्क - 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135